महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

ई-मेल :deangmca@gmail.com कार्यालय : ०२४०-२४०२०२८

जा.क्र. शावैमवरुछसं/ल.ले./ ७०५ /२०२६ दिनांक : १९ /०२/२०२६

नोटीस :-

**गट-ड (वर्ग-४) संवर्गातील समकक्ष पदांवर आदेश स्विकारण्याकरीता उपस्थित राहणेबाबत**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर या संस्थेतील वर्ग-४ संवर्ग व समकक्ष पदे सरळ सेवेने भरण्यासाठी दि. ३० मे २०२५ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर जाहिरातीनुसार महाविद्यालयासाठी ५७ पदे व रुग्णालयासाठी ३०० पदे, अशी एकूण ३५७ पदे भरतीसाठी अधिसूचित करण्यात आली होती.तसेच सदर पदभरतीसाठी दि. २५, २६ व २८ ऑगस्ट २०२५ रोजी टीसीएस कंपनीमार्फत लेखी परीक्षा घेण्यात आली होती. त्यानंतर टीसीएस कंपनीमार्फत नॉर्मलायझेशन पद्धतीनुसार उमेदवारांचे गुणांकन करून दि.१ डिसेंबर २०२५ रोजी उमेदवारांची यादी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,छत्रपती संभाजीनगर च्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. तदनंतर संस्थेतर्फे गठित करण्यात आलेल्या समितीमार्फत गुणवत्ता क्रमांकानुसार व विविध संवर्गातील आरक्षणानुसार उमेदवारांची मूळ कागदपत्रे तपासणी करण्यात आलेली होती. **सामाजिक आरक्षणांतर्गत येणाऱ्या धरणग्रस्त,प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, दिव्यांग, खेळाडू, माजी सैनिक, अंशकालीन व अनाथ उमेदवार वगळून, इतर पात्र** उमेदवारांचे आदेश जिल्हयाचे मा.पालकमंत्री श्री.संजयजी सीरसाठ साहेब, सामाजीक न्याय मंत्री, म.रा, मा. मा.ना.श्री.अतुलजी सावे साहेब,मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण,दुग्ध विकास, अपारंपारिक ऊर्जा,महाराष्ट्र राज्य, अभ्यागत समितीचे अध्यक्ष, मा.प्रदिपजी जैस्वाल तथा आमदार व इतर सर्व सन्माननिय लोकप्रतिनिधी, अभ्यागत समिती सदस्य, मा.जिल्हाधिकारी तसेच संस्थेचे मा.अधिष्ठाता, डॉ.शिवाजी सुक्रे यांच्या शुभहस्ते पात्र उमेदवारांचे आदेश निर्गमीत करण्यात येणार आहे. **तरी सर्व पात्र उमेदवारांनी दि.२१.०२.२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता आदेश स्विकारण्यासाठी नवीन महाविद्यालीयन परिषद कक्ष, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे व्यक्तीशः उपस्थित रहावे.**

**(डॉ.शिवाजी बा.सुक्रे)**
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर.